| | |
|---|---|
| संच | B |

# कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व
## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय
## गट क भरतीच्या लेखी परीक्षेसाठी प्रश्नपुस्तिका
## मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित

सत्र - १

| | |
|---|---|
| प्रश्नपत्रिका क्र. | 172858 |

परीक्षा दिनांक : २२/११/२०१५

वेळ : १०.०० ते ११.३० (९० मिनिटे)

| | |
|---|---|
| एकूण प्रश्न | १०० |
| सत्र : | १ ले |

| | |
|---|---|
| एकूण पृष्ठे | १६ |

## सूचना

1. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापुर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.
2. आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

3. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**
4. या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना A, B, C आणि D असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.
   **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**
5. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.
6. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.
7. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्याय उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा करण्यात येणार नाहीत".

## ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विभागाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका विभागाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत / प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि / किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती विभागाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीय वृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पृष्ठावर पहा

https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

## कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

172859



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

## भाग - 1 : मराठी

1. 'तो दररोज शाळेत जातो' या वाक्यातील प्रयोग ओळखा :

   (A) सकर्मक कर्तरी (B) कर्मणी (C) अकर्मक कर्तरी (D) भावे

2. पुढीलपैकी विरुद्धार्थाची योग्य जोडी नसलेला पर्याय कोणता ?

   (A) प्रसरण × आकुंचन (B) प्राचीन × अर्वाचीन

   (C) रजनी × यामिनी (D) प्रतिगामी × पुरोगामी

3. 'धरी' या शब्दाचा विभक्ती प्रत्यय कोणत्या प्रकारचा आहे ?

   (A) प्रथमा (B) द्वितीया (C) पंचमी (D) सप्तमी

4. कथालेखन हा निबंधप्रकार नेहमी ________ काळात लिहिला जातो.

   (A) वर्तमानकाळ (B) भूतकाळ (C) भविष्यकाळ (D) पूर्ण वर्तमानकाळ

5. निश्चितपणे एकवचनी असलेला पुढीलपैकी शब्द कोणता ?

   (A) केळी (B) सुना (C) चुका (D) सभा

6. लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥
   या वाक्यातील अलंकार कोणता ?

   (A) अपन्हुती (B) अनन्वय

   (C) दृष्टान्त (D) अतिशयोक्ती

*पुढील पदय वाचून त्याखालील प्रश्न-क्रमांक 7 ते 9 ची योग्य उत्तरे पर्यायातून निवडा :*

जोडोनियां धन उत्तम वेव्हारे । उदास विचारें वेच करी ॥
उत्तम चि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥
परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥
भूतदया गाईपशूचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ।
शांतिरुपे नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ॥
तुका म्हणे हें चि आश्रमाचे फळ । परमपद बळ वैराग्याचे ॥

7. 'आश्रम' या पदाचा अभंगात नेमका अर्थ काय आहे ?

   (A) वानप्रस्थाश्रम (B) गृहस्थाश्रम

   (C) संन्यासाश्रम (D) ब्रह्मचर्याश्रम



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

8. कवितेतील 'वेच करी' या शब्दप्रयोगाचा योग्य अर्थ काय ?

(A) वेचणे
(B) गोळा करणे
(C) खर्च करणे
(D) मिळवणे

9. 'तान्हेल्या जीवन वनामाजी' यातील 'जीवन' शब्दाचा समर्पक अर्थ काय ?

(A) जगणे
(B) आयुष्य
(C) चेतना
(D) पाणी

10. "रमेश, तुझी शंका बरोबर आहे." या वाक्यात किती विरामचिन्हे आली आहेत ?

(A) 2
(B) 3
(C) 4
(D) 5

11. 'बाग'या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द कोणता ?

(A) बगिचा
(B) उदयान
(C) उपवन
(D) रान

12. 'मालनने खूप कष्ट करून मुलांना वाढवले.' या वाक्यात अधोरेखित शब्दसमूहाच्या जागी योग्य वाक्प्रचार कोणता येईल ?

(A) हाडाची काडे करणे.
(B) हातावरचे पोट सांभाळणे.
(C) अडचणींवर मात करणे.
(D) काळीज मोठे करणे.

13. 'बनगरवाडी' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

(A) ग. दि. माडगूळकर
(B) व्यंकटेश माडगूळकर
(C) मारुती चितमपल्ली
(D) बाबूराव बागूल

14. पुढील म्हण पूर्ण करा :

न कर्त्याचा वार........

(A) रविवार
(B) ऐतवार
(C) शनिवार
(D) गुरुवार

15. 'दगड' या शब्दाचे सामान्यरुप काय होईल ?

(A) दगडा
(B) दगड
(C) दगडू
(D) दगडे



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

*पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न-क्रमांक **16** ते **18**ची योग्य उत्तरे पर्यायातून निवडा :*

बऱ्याच लोकांना माहीत नसेल की अंदमान-निकोबार मध्ये 572 लहान मोठी बेटे आहेत. त्यापैकी फक्त 30-32 बेटांवर मनुष्यवस्ती आहे. आपण अंदमान-निकोबार असे जोडनाव उच्चारत असलो, तरी दोन्ही बेटांमध्ये खूप अंतर आहे. 'कार निकोबार'ला जायला एक रात्र तर 'ग्रेट निकोबार'ला जायला दोन दिवस लागतात. ग्रेट निकोबार समूहातील इंदिरा पॉईंट हे भारताचे शेवटचे टोक इंडोनेशियाला जवळ आहे. रात्री येथून जावा, सुमात्रा बेटांवरील दिवे दिसतात. निकोबार बेटांवर थेट जाता येत नाही. अंदमान हून डेप्युटी कमिशनरची परवानगी घेऊनच निकोबारला जाता येते.

**16.** निकोबारला जाण्यासाठी कोणाची परवानगी आवश्यक असते ?

(A) डेप्युटी कमिशनर (B) कमिशनर (C) पंतप्रधान (D) लष्कर प्रमुख

**17.** अंदमानहून ग्रेट निकोबारला जायला किती वेळ लागतो ?

(A) एक रात्र (B) दोन दिवस (C) एक दिवस (D) दोन तास

**18.** इंदिरा पॉईंट हे कोणत्या देशाचे शेवटचे टोक आहे ?

(A) इंडोनेशिया (B) निकोबार (C) भारत (D) अंदमान

**19.** पुढीलपैकी शुद्ध शब्द कोणता ?

(A) धनुविदया (B) धर्नुविदया (C) धनुर्विदया (D) धनूर्विदया

**20.** 'आजही मी तेथील प्रमुख सल्लागार आहे.' या वाक्यातील काळ कोणता आहे ?

(A) भूतकाळ (B) भविष्यकाळ

(C) वर्तमानकाळ (D) चालू भूतकाळ

**21.** पुढीलपैकी द्वंद्व समासाचे उदाहरण नसलेला पर्याय कोणता ?

(A) पापपुण्य (B) नीलकंठ (C) विटीदांडू (D) चहापाणी

**22.** 'मी <u>स्वतः</u> त्याला पाहिले' या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार कोणता ?

(A) संबंधी सर्वनाम (B) आत्मवाचक सर्वनाम

(C) अनिश्चित सर्वनाम (D) पुरुषवाचक सर्वनाम

**23.** गदिमा प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 2008 चा 'गदिमा' पुरस्कार कोणाला देण्यात आला ?

(A) शं. ना. नवरे (B) बाबासाहेब पुरंदरे

(C) डॉ. विठ्ठल वाघ (D) ना. धो. महानोर



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

24. पुढीलपैकी स्वतंत्र स्त्रीलिंगी रुप असणारे नाम ओळखा :

(A) सुतार (B) वानर (C) तरुण (D) राजा

25. पुढीलपैकी स्वरसंधीच्या गटात न बसणारे उदाहरण कोणते ?

(A) ज्ञानेश्वर (B) सूर्योदय (C) मनुष्येतर (D) अब्ज

## भाग - 2 : इंग्रजी

26. The phobia about 'poverty' or 'money' problem is called :

(A) Androphobia (B) Peniphobia

(C) Theophobia (D) Ergophobia

27. Choose the correct alternative of verb :

*Ketaki hopes, she _________ pending work by five today.*

(A) will have completed (B) will completed

(C) will have been completed (D) will be complete

28. Choose the correct 'question tag' to the given sentence :

*'Manasi ventured to obstruct my path.'*

(A) ventured not she ? (B) wasn't she ?

(C) didn't she ? (D) didn't Manasi ?

29. Choose the correct opposite of :

*'Commodious'*

(A) numerous (B) leisurely (C) limited (D) expensive

30. Choose the part of the given sentence has an error. If no error, the answer is (d).

*The wife is not / yet acquainted with / her husband's liking / No error*
*a b c d*

(A) a (B) b (C) c (D) No error



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

31. Choose the correct degree sentence/sentences from the given of the given sentence :

*"Mumbai is one of the richest towns."*

(A) Mumbai is richer than many other towns.

(2) Mumbai is richer than any other town.

(3) Very few towns are as rich as Mumbai.

(4) Very few town is as rich as Mumbai.

(A) Only 1 (B) 1 and 4 (C) Only 3 (D) 1 and 3

32. Choose one word substitution for the given :

*'One who does not believe in God'.*

(A) Atheist (B) Orthodox (C) Religious (D) Priest

33. Identify the figures of speech in the given line :

*'Fools rush in where angels fear to tread.'*

(A) Epigram (B) Pun (C) Irony (D) Climax

34. Choose the correct 'Passive Voice' sentence of the given :

*'We keep our jewellery in the bank.'*

(A) Our jewellery is kept in the bank by us.

(B) Our jewellery was kept in the bank by us.

(C) Our jewellery were keep in the bank by us.

(D) Our jewellery is keep in the bank by us.

35. Choose the correct spelt word :

(A) Leutenant (B) Lieutinant (C) Lieutenant (D) Liutenant

36. Rearrange the parts (PQRS) to form the correct sentence :

(P) will normally be granted

(Q) candidates should note

(R) that no request for

(S) change of centre

(A) PQRS (B) RQPS (C) PSQR (D) QRSP



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

37. The cry of 'pigs' is called :

(A) bleat (B) grunt

(C) bray (D) gibber

38. Choose the correct alternative :

*May we have _________ pleasure of your company ?*

(A) the (B) an (C) a (D) no article

39. Indentify the underlined clause in the sentence :

*The host already had taken dinner <u>when the guest arrived</u>.*

(A) Adverb clause of time

(B) Adverb clause of place

(C) Adverb clause of manner

(D) Adverb clause of condition

40. Choose the correct 'synonym' of :

*'inexplicable'*

(A) confusing (B) chaotic (C) unconnected (D) unaccountable

41. 'To fly off the handle' means :

(A) to take off (B) to be indifferent

(C) to dislocate (D) to lose one's temper

42. Choose the correct indirect speech of the given sentence :

*The manager said, "Well, what can I do for you ?"*

(A) The manager asked well what he could do for him.

(B) The manager wondered what he could do for him.

(C) The manager wanted to know what he could do for him.

(D) The manager said that what he couldn't do for him.



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

43. Choose the correct 'Wh-Question' to get the underlined part as an answer :

*"He was dismissed from his service because they found him dishonest."*

(A) Why was he dismiss from his service ?

(B) Why he was dismissed from his service ?

(C) Why was he dismissed from his service ?

(D) Why he dismiss him from his service ?

44. The young one of 'deer' is called :

(A) Fawn (B) Cub (C) Calf (D) Cygnet

45. Select the combination of numbers so that letters arranged accordingly will form a meaningful word :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| E | L | G | N | I | M |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

(A) 312654 (B) 654321 (C) 653214 (D) 356214

*Read the passage and choose the correct answer :* **[Ques. No. 46 to 50]**

In the highest sense religiion is an intensely individual issue. But there is a national question also. We must hold together. And we cannot hold together only on the strength of police regulations. An internal regulator of conduct is absolutely necessary. Will men be good and wise without the aid of religion ? As modern life has multiplied desires without the corrective of a sense of spiritual values, knowledge of modern science does not reduce either greed or lust. Indeed it has nothing to do with the criminal disturbances of the mind. On the contrary, if finds fresh tools for greater indulgence in all forms of greed, lust and anger. It is true that a sense of shame by itself often prevents over misconduct. But it does not go to the root of the mischief; it does not stop undesirable mental activities. The only thing that can prevent or restrain these evils is the religious sense.

46. The worst thing about modern science is that it has :

(A) produced dangerous weapons

(B) spread new superstitions

(C) contributed to the decline of our values

(D) discredited all religions



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

47. The statement "We must hold together" means that we should :

(A) be politically united (B) work together

(C) be spiritually united (D) keep up our nation's prestige

48. The author holds that the perfect remedy for man's evil propensities is a...

(A) sense of shame

(B) religious sense

(C) combinaiton of a sense of shame and religion

(D) sense of good conduct

49. According to the author, religion is essentially a :

(A) matter having national relevance

(B) body of rules and regulations

(C) social matter

(D) sacrifice of worldly desires

50. The author thinks that in the modern times :

(A) the police have grown very powerful

(B) peoples needs have increased

(C) politicians have become corrupt

(D) we are practising several faiths

## भाग - 3 : सामान्य ज्ञान

51. वस्तूवरील गुरुत्वीय बल म्हणजे त्या वस्तूचे ________ होय.

(A) वस्तुमान (B) आकारमान (C) वजन (D) आकर्षन

52. सायमा या भूकवचाच्या भागात कोणत्या संयुगाचे प्रमाण जास्त असते ?

(A) लोखंड व निकेल (B) सिलिका व मॅग्नेशियम

(C) सिलिका व अल्युमिनियम (D) लोखंड व अल्युमिनियम



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

53. महाराष्ट्रातील चादरी बनविण्यासाठी प्रसिद्ध असलेले ठिकाण कोणते ?

(A) पैठन (B) नागपूर (C) सोलापूर (D) एकोंडी

54. 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' कोणत्या तारखेला साजरा केला जातो ?

(A) 3 मे (B) 1 मे (C) 15 मे (D) 17 मे

55. जीवनसत्त्व 'अ'च्या अभावामुळे कोणता रोग होतो ।

(A) रातांधळेपणा (B) रंगाधळेपणा (C) स्कर्व्ही (D) बेरीबेरी

56. 3 ते 5 एप्रिल, 2015 दरम्यान झालेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कोठे झाले ?

(A) पूणे (B) सांगली (C) धुमान (D) मुंबई

57. सुशीलकुमार हा खेळाडू कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?

(A) कुस्ती (B) नेमबाजी (C) बॉक्सींग (D) टेनिस

58. काझीरंगा हे एकशिंगी गेंडासाठी प्रसिद्ध असणारे राष्ट्रीय उद्यान कोणत्या राज्यात आहे ?

(A) आसाम (B) पश्चिम बंगाल (C) नागालँड (D) झारखंड

59. क्षेत्रफळाच्यादृष्टीने भारतातील सर्वात मोठे राज्य कोणते ?

(A) उत्तरप्रदेश (B) बिहार (C) गुजरात (D) राजस्थान

60. ययाती या कादंबरीचे लेखक कोण ?

(A) ना. सी. फडके (B) कुसूमाग्रज

(C) वि. स. खांडेकर (D) ह. ना. आपटे

61. खालीलपैकी रूपातंरित खडक कोणता ?

(A) कोळसा (B) चुनखडी (C) ग्रॅफाइट (D) ग्रॅनाइट

62. नाईल नदीची देणगी कोणाला म्हणतात ?

(A) थायलंड (B) इजिप्त (C) सयाम (D) पंजाब

63. मेघालय या राज्याची राजधानी कोणती ?

(A) शिलाँग (B) ऐंजाल (C) इंफाळ (D) कोहिमा



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

64. पंडीत नेहरू यांच्या समाधीस्थळचे नांव काय ?

(A) राजघाट (B) शांतीवन (C) विरभूमी (D) शक्तीस्थळ

65. प्रकाशवर्ष हे एकक काय मोजण्यासाठी वापरतात ?

(A) प्रकाशाचा वेग (B) प्रकाशाची तिव्रता (C) अंतर (D) काळ

66. कोणत्या समाज सुधारकाचा जन्मदिवस 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून साजरा केला जातो ?

(A) महात्मा जोतीराव फूले (B) छत्रपती शाहू महाराज

(C) बाबा आमटे (D) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

67. भारताचा राष्ट्रीय पक्षी कोणता ?

(A) गरूड (B) कबुतर (C) मोर (D) कावळा

68. राज्यपालाची नेमणूक कोण करतात ?

(A) राष्ट्रपती (B) पंतप्रधान (C) मुख्यमंत्री (D) मंत्रीमंडळ

69. कोणार्क येथील सूर्यमंदीर कोणत्या राज्यात आहे ?

(A) पश्चिम बंगाल (B) केरळ (C) ओरिसा (D) कर्नाटक

70. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कार्यालय कोठे आहे ?

(A) न्यूयार्क (B) जिनिव्हा (C) पॅरिस (D) द हेग

71. व्यक्तीगत क्रिडाप्रकारात ऑलिम्पिकमधे सर्वात प्रथम सुवर्णपदक मिळविणारा भारतीय खेळाडू कोण ?

(A) खशाबा जाधव (B) डॉ. करणसिंग (C) विजेंदरकुमार (D) अभिनव बिंद्रा

72. कोणता रक्तगट असणाऱ्या व्यक्तीला सर्वग्राही म्हणतात ?

(A) A (B) B (C) AB (D) O

73. पेशीचे उर्जा निर्मिती केंद्र कोणाला म्हणतात ?

(A) केंद्रक (B) तंतुकणिका (C) लयकारिका (D) रायबोझोम्स

74. 'शारदा सदन' ही संस्था कोणी स्थापन केली ?

(A) महादेव गोविंद रानडे (B) पंडिता रमाबाई

(C) स्वामी विवेकानंद (D) ताराबाई शिंदे

75. आझाद हिंद सेनेने अंदमान व निकोबार ही बेटे जिंकल्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अंदमानला काय नांव दिले होते ?

(A) स्वराज (B) स्वदेश (C) शहीद (D) गौरव



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

## भाग - 4 : अंकगणित

76. एका घनाचे घनफळ 125 घ.सेमी. आहे. तर त्याच्या एका पृष्ठाचे क्षेत्रफळ किती ?

(A) 125 चौ.सेमी. (B) 25 चौ.सेमी. (C) 25 घन सेमी. (D) 5 सेमी.

77. 7, x, 21, 15 या संख्या प्रमाणात आहेत तर xची किंमत काढा :

(A) 5 (B) 7 (C) 12 (D) 3

78. तीन क्रमवार नैसर्गिक संख्याची बेरीज 243 आहे.

तर त्यातील सर्वात लहान व सर्वात मोठ्या संख्येची बेरीज किती ?

(A) 161 (B) 163 (C) 162 (D) 160

79. एका माणसाला त्याच्या कामाची मजुरी ताशी 15 रुपये मिळतात. जर त्याने दिवसाला 8 तासांप्रमाणे 5 दिवस काम केले, तर त्याची एकूण कमाई किती होईल ?

(A) रु. 75 (B) रु. 120 (C) रु. 500 (D) रु. 600

80. जर $7^{(x-5)} = (343)^2$, तर xची किंमत किती ?

(A) –11 (B) 11 (C) –3 (D) 7

81. रु. 2000 $2\frac{1}{2}$ वर्ष गुंतवण्या ऐवजी रु. 3000, 2 वर्ष गुंतवले असता सरळव्याज रु. 80 जास्त मिळते, तर व्याजाचा दर किती ?

(A) 10% (B) 8% (C) 6% (D) 9%

82. द.सा.द.शे. 5 दराने 12000 रुपयांचे 2 वर्षाचे चक्रवाढ व्याज किती येईल ?

(A) रु. 1320 (B) रु. 1230 (C) रु. 1330 (D) रु. 1220

83. एका गावात 16400 झाडे आहेत. दर वर्षी त्यात 5% वाढ होते तर दोन वर्षांनी त्या गावात किती झाडे असतील ?

(A) 18,081 (B) 17,576 (C) 16,775 (D) 19,874

84. एक टेबल 750 रुपयांना विकले असता एका दुकानदारास 20% नफा होतो. तर त्या टेबलाची खरेदी किंमत किती ?

(A) रु. 1100 (B) रु. 625 (C) रु. 600 (D) रु. 150



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

85. मीनाक्षी व भाग्यश्री यांच्या दोन वर्षापुर्वीच्या वयाचे गुणोत्तर 5 : 6 होते, आज त्यांच्या वयांचे गुणोत्तर 6 : 7 आहे, तर मीनाक्षीचे आजचे वय किती ?

(A) 10 वर्ष (B) 12 वर्ष (C) 13 वर्ष (D) 14 वर्ष

86. दोन संख्याचा गुणाकार 2250 असून त्यांचा मसावि 15 आहे तर त्यांचा लसावि किती असेल ?

(A) 150 (B) 240 (C) 300 (D) 360

87. एका माणसाला एक वस्तू विकून 15% नफा होतो. त्या वस्तूची विक्री किंमत रु. 23 असल्यास तिची खरेदी किंमत किती ?

(A) रु. 8 (B) रु. 15 (C) रु. 20 (D) रु. 22

88. आई आणि मुलाच्या वयाचे गुणोत्तर 6 : 1 आहे. त्यांच्या वयाची बेरीज 35 असल्यास आईचे वय काय ?

(A) 35 वर्षे (B) 30 वर्षे (C) 25 वर्षे (D) 40 वर्षे

89. 800 रुपयाचे 5 दराने 2 वर्षाचे सरळव्याज किती होईल ?

(A) रु. 80 (B) रु. 89 (C) रु. 101 (D) रु. 82

90. घरमालकाने घराचे मासिक भाडे 10% वाढवले. पुर्वीचे भाडे रु. 1500 असल्यास आताचे भाडे किती ?

(A) रु. 1510 (B) रु. 1610 (C) रु. 1650 (D) रु. 1600

91. 250 संत्र्यापैकी 50 संत्री एका वर्गात वाटली, तर शेकडा किती संत्री शिल्लक राहिली ?

(A) 20% (B) 25% (C) 80% (D) 75%

92. एका आयताकार सभागृहाची लांबी 20 मीटर व रुंदी 15 मी. तर 0.25 मी. बाजू असलेल्या चौरसाकृती फरशा त्या सभागृहात बसवण्यास किती फरशा लागतील ?

(A) 2400 (B) 1120 (C) 8400 (D) 4800

93. $\left[4\frac{1}{2}+2\frac{1}{4}\right] \div \left[4\frac{1}{2}-2\frac{1}{4}\right]$ची किंमत किती ?

(A) 0 (B) 1 (C) 2 (D) 3

94. एका चाकाचा व्यास 28 सेमी. आहे. तर 2.2 किमी अंतर पार करण्यासाठी त्या चाकाचे किती फेरे होतील ?

(A) 3000 (B) 6000 (C) 300 (D) 2500



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**95.** $70 \div (5 \times 7) + 3 - 1 =$ किती ?

(A) 3 (B) 4 (C) 5 (D) 6

**96.** तीन संख्या प्रमाणात असून त्यांची अंत्यपदे 7 व 28 आहेत, तर मध्यमपद कोणते ?

(A) 4 (B) 14 (C) 24 (D) 21

**97.** 5, 7 व 9 हे अंक एकदाच वापरून तयार होणाऱ्या तीन अंकी संख्याची सरासरी काढा :

(A) 777 (B) 772 (C) 672 (D) 770

**98.** एका समद्विभुज काटकोन त्रिकोणाच्या कर्णाची लांबी $6\sqrt{2}$ सेमी. आहे, तर त्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ काढा.

(A) 18 चौ.सेमी. (B) $18\sqrt{2}$ चौ.सेमी.

(C) 36 चौ.सेमी. (D) 12 चौ.सेमी.

**99.** 3.5 सेमी. त्रिज्या असलेल्या गोलाचे वक्रपृष्ठफळ किती ?

(A) 77 चौ.सेमी. (B) 112 चौ.सेमी.

(C) 126 चौ.सेमी. (D) 154 चौ.सेमी.

**100.** जर $4^{x-1} = 32^{x-1}$ तर xची किंमत काढा :

(A) 3 (B) 2 (C) 1 (D) 5



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/

**सूचना : (पृष्ठ 1 वरुन पुढे...)**

8. प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरीक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्येशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनयम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.
9. सदर प्रश्नपत्रिकेसाठी विभागाच्या विहित केलेली वेळ संपल्यानंतर वा संपण्यापुर्वी उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी नाही. **परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपली प्रश्नपुस्तिका व आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-१ (विभागाची प्रत) पर्यवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

**नमूना प्रश्न :**

प्र.क्र. 101 "तितिक्षा" या शब्दासाठी योग्य शब्दसमूह कोणता ?

(A) केलेले उपकार जाणणारा.
(B) हाल अपेष्टा सहन करण्याचा गुण.
(C) केलेले उपकार न जाणणारा.
(D) जाणून घेण्याची इच्छा असणारा.

या प्रश्नाचे योग्य उत्तर "(B) हालअपेष्टा सहन करण्याचा गुण" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(B)" होईल यास्तव खालील प्रमाणे प्रश्न क्र. 101 मधील उत्तर क्र. "(B)" हे वर्तुळ पुर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.



अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरली त्या-त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पुर्णपणे छायांकित करुन दाखववावा. **हयाकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



https://www.freshersnow.com/previous-year-question-papers/